महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्र. मआ/साप्रवि/आस्था/ ६५१८
दिनांक : १३/०३/ २०२०.

**-: आदेश :-**

विषय : कोरोना व्हायरस (कोवीड-१९) ला प्रतिबंधात्मक उपाय योजना करणेबाबत.

संदर्भ : जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय पुणे (गृहशाखा) यांचे पत्र क्र. पगस/कावि/४१०/२०२० दि.११/०३/२०२०

मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांनी संदर्भांकित पत्रान्वये दिलेले आदेश या सोबत सादर केलेले आहेत. त्याअनुषंगाने सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यवाही करावी.

सदर आदेश पुणे महानगरपालिका संकेतस्थळावर परिपत्रक सदरात उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(शेखर गायकवाड)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रती: **खातेप्रमुख** (सर्व),
पुणे महानगरपालिका, पुणे
यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित--

वाचले:- १) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र क्र. मह-३/नैआ/कावि/३७६/२०२०, दि.११/०३/२०२०.

२) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५६

---

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी,
कार्यालय, पुणे (गृहशाखा)
क्र.पगस/कावि/ ४१०/२०२०.
दिनांक:- ११/०३/२०२०.

विषय: - कोरोना व्हायरस (कोवीड-१९) ला प्रतिबंधात्मक उपाय योजना करणेबाबत...

आदेश,

ज्याअर्थी, संदर्भ क्र. १ नुसार मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांनी पुणे विभागात कोरोना व्हायरस (कोविड-१९) चे रुग्ण आढळून आले असून, हा व्हायरस तीव्र संसर्गजन्य स्वरुपाचा असलेने तातडीने खबरदारीच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यावशक झाले आहे. त्यासाठी कोवीड-१९ ची लक्षण आढळलेल्या संशयित रुग्णांना Qurantine ठिकाणी व त्यापैकी तपासणी अंती ज्या रुग्णामध्ये कोवीड-१९ ची लागण झाली आहे त्यांना तातडीने Isolation ठिकाणी ठेवून आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा पुरविणेच्या आहेत. सबब पुणे विभागातील कोविड-१९ च्या प्रादुर्भावाचे पार्श्वभूमीवर जिल्हयातील उपजिल्हाधिकारी, तहसिलदार इतर अधिकारी व कर्मचारी तसेच इतर सर्व विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांना नियुक्तीच्या मुख्यालयात हजर रहाणेच्या व कोणत्याही परिस्थितीत सुट्टीच्या दिवशीही मुख्यालय न सोडण्याचे निर्देश मा. विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिलेले आहेत.

त्याअर्थी, मी, नवल किशोर राम, जिल्हादंडाधिकारी, पुणे केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये पुणे जिल्हयातील कोवीड-१९ च्या प्रादुर्भावाचे पार्श्वभूमीवर शासन / प्रशासन टाकील ती जबाबदारीचे कामकाज पार पाडण्यासाठी जिल्हयातील सर्व उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच इतर सर्व विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांनी आपले नियुक्तीच्या ठिकाणी मुख्यालयात हजर रहावे, तसेच कोणत्याही परिस्थितीत सुट्टीच्या दिवशीही मुख्यालयात उपस्थित राहावे. सदर बाबतीमध्ये काही हालगर्जीपणा झाल्यास केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५६ अन्वये कार्यवाहीस पात्र राहाल याची नोंद घ्यावी.

(नवल किशोर राम)
जिल्हादंडाधिकारी पुणे

जिल्हाधिकारी पुणे

प्रति, १) विभाग प्रमुख, सर्व...शासकीय निमशासकीय...
२) उपजिल्हाधिकारी, ....सर्व....
३) उपविभागीय अधिकारी, ....सर्व....
४) तहसिलदार, ....सर्व....
५) शाखा अधिकारी, ....सर्व....

प्रत:- मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांजकडे माहितीसाठी सविनय सादर

Scanned with CamScanner